**ठळक बातम्या**

१९ व्या रोजगार मेळ्यातून देशातल्या ५१ हजार युवकांना सरकारी नियुक्तीपत्रांचं वितरण

पेट्रोल आणि डिझेलच्या दरात पुन्हा वाढ, पेट्रोल ८७ पैशांनी तर डिझेल ९१ पैशांनी महाग

देशात पेट्रोल आणि डिझेलचा तुटवडा नसल्याची इंडियन ऑईलची हमी

शेतकऱ्यांना आवश्यक तितका डिझेलचा सुरळीत पुरवठा व्हावा यासाठी मुख्यमंत्र्यांचे जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना निर्देश

२०२५-२६ साठी केंद्र सरकारला विक्रमी २ लाख ८६ हजार कोटी रुपयांचा लाभांश हस्तांतरित करण्यास रिझर्व बँकेच्या संचालक मंडळाची मंजुरी

आणि

ठाणे जिल्ह्यात २१ नायजेरियन नागरिकांना अटक

**<><><><><>**

भारताच्या विकासयात्रेत सहभागी व्हायला जग उत्सुक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं आहे. ते आज १९ व्या रोजगार मेळ्याला दूरस्थ पद्धतीने संबोधित करत होते. नुकत्याच केलेल्या ५ देशांच्या दौऱ्याचा उल्लेख करुन ते म्हणाले की तरुणांना संधी, रोजगार आणि जागतिक ओळख उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सरकार विविध देशांबरोबर भागीदारी करत आहे. ऊर्जा क्षेत्रात निर्माण होणाऱ्या नवनवीन संधींचा उल्लेख केला. परदेशात शाश्वत ऊर्जा, स्वच्छ ऊर्जा क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या नवीन संधी निर्माण केल्या जात आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

**- - - बाईट – नरेंद्र मोदी - - -**

२०४७ पर्यंत विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी विविध क्षेत्रांमध्ये गुंतवणूक आकर्षित करण्यात येत आहे, असंही मोदी म्हणाले. हा रोजगार मेळा देशभरातल्या ४७ ठिकाणी आयोजित करण्यात आला. देशभरातून निवडलेले नवनियुक्त उमेदवार, रेल्वे मंत्रालय, गृह मंत्रालय, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय आणि उच्च शिक्षण विभाग यांसारख्या विविध मंत्रालयं आणि विभागांमध्ये रुजू होतील. याआधीच्या १८ रोजगार

मेळाव्यांच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे १२ लाख युवकांना विविध सरकारी विभागांमधे नियुक्ती मिळाली आहे.

<><><><><>

सार्वजिनिक क्षेत्रातल्या इंधन तेल कंपन्यांनी आज पेट्रोल आणि डिझेलच्या दरात पुन्हा एकदा वाढ केली. त्यामुळे पेट्रोल प्रति लिटर ८७ पैशांनी, तर डिजेल प्रति लिटर ९१ पैशांनी महागलं आहे. त्यामुळे मुंबईत पेट्रोलचा दर १०८ रुपये ४९ पैसे प्रति लिटर, तर डिझेलचा दर ९५ रुपये २पैसे प्रति लीटर झाला आहे. गेल्या ९ दिवसात तिसऱ्यांदा इंधन दरवाढ झाली आहे.

पश्चिम आशियात भूराजकीय संघर्ष सुरु झाल्यानंतर इंधन तेल पुरवठ्यात अडचणी निर्माण होऊन जागतिक स्तरावर इंधनाचे दर कडाडले आहेत.

<><><><><>

देशात पेट्रोल आणि डिझेलचा तुटवडा नसल्याची हमी इंडियन ऑईल या कंपनीनं ग्राहकांना तसंच सर्वसामान्य नागरिकांना दिली आहे. काही ठरावीक विक्री केंद्रांवर सध्या उद्भवलेली परिस्थिती ही केवळ स्थानिक पातळीवर असून तात्पुरत्या स्वरूपाची असल्याचं इंडियन ऑईलनं जारी केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. स्थानिक पातळीवर मागणी आणि पुरवठ्यात असंतुलन निर्माण झाल्यानं तसंच विक्री पद्धतीमुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचं कंपनीचं म्हणणं आहे. या महिन्याच्या १ ते २२ तारखेपर्यंत या इंधनांच्या विक्रीत गेल्या वर्षीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाल्याचं कंपनीनं म्हटलं आहे. पेट्रोल विक्रीत १४ टक्के तर डिझेल विक्रीत १८ टक्के वाढ झाल्याचं या निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

शेतकऱ्यांना आवश्यक तितका डिझेलचा सुरळीत पुरवठा व्हावा यासाठी जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना निर्देश दिले असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितलं. एका कार्यक्रमासाठी शिर्डी इथं गेले असताना ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. ग्रामीण भागात इंधन सहज उपलब्ध होत नसल्यानं या सूचना केल्याचं ते म्हणाले. काही ठिकाणी इंधन विक्रीत अचानक २० ते ३० टक्के वाढ झाल्याकडेही फडणवीस यांनी लक्ष वेधलं आणि शेतकऱ्यांच्या नावानं इंधनाचा काळाबाजार करणाऱ्यांना इशारा दिला.

आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर नागरिक इंधन साठा करू लागल्याने राज्यात पेट्रोल आणि डिझेलच्या विक्रीत मेच्या पंधरवड्यापर्यंत २० टक्के वाढ झाली आहे. दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी शिर्डीपर्यंत वंदे भारत ट्रेननं प्रवास केला.

<><><><><>

पेट्रोलियम पदार्थांच्या दरवाढीवरून काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केंद्र सरकावर टीका केली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती कमी असूनही सरकार पेट्रोल, डिझेल, सीएनजी आणि एलपीजीची दरवाढ करून जनतेवर वाढीव बोजा लादत असल्याचं ते म्हणाले. समाजमाध्यमावरील पोस्टद्वारे त्यांनी ही टीका केली आहे.

<><><><><>

भारतीय रिझर्व्ह बँकेने आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी केंद्र सरकारला विक्रमी २ लाख ८६ हजार कोटी रुपयांचा लाभांश  हस्तांतरित करण्यास मंजुरी दिली आहे. रिझर्व बँकेने आतापर्यंत केलेल्या सर्वाधिक लाभांश वितरणांपैकी हे एक आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या केंद्रीय संचालक मंडळाची ६२३ वी  बैठक बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली काल मुंबईत झाली. यावेळी जागतिक आणि देशातंर्गत आर्थिक परिस्थितीचा,भविष्यातल्या संभाव्य धोक्यांचा आढावा घेतला. बँकेचं एकूण उत्पन्न गेल्या वर्षीच्या तुलनेत २६ पूर्णांक ४२ शतांश  टक्क्यांनी वाढलं तर जोखमीच्या तरतुदींपूर्वीचा  खर्च २७ पूर्णांक ६० शतांश टक्क्यांनी वाढला आहे.

<><><><><>

जी-राम-जी या ग्रामीण रोजगार कायद्याची अंमलबजावणी १ जुलैपासून होणार आहे, या पार्श्वभूमीवर आज जी-राम-जी कायद्याचा मसुदा नागरिकांची मतं मागवण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आला. या प्रस्तावित मसुद्यामधे राष्ट्रीय पातळीवरली सुकाणू समिती, संक्रमणकालीन तरतुदी, केंद्रीय ग्रामीण रोजगार हमी परिषद, वेतन आणि बेरोजगार भत्ता, प्रशासकीय खर्च, तक्रार निवारण आदी तरतुदींचा समावेश आहे. जी-राम-जी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी संस्थात्मक, प्रशासकीय आणि आर्थिक चौकट निश्चित करणं हे या नियमांचं उद्दिष्ट असल्याचं ग्रामविकास मंत्रालयाने म्हटलं आहे.

<><><><><>

ठाणे आणि नवी मुंबई पोलिसांनी संयुक्त मोहिम राबवत पलावा सिटी परिसरातून २१ नायजेरियन नागरिकांना अटक केली आहे. यापैकी दोन सराईत गुन्हेगार आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर कोट्यवधी रुपयांच्या अमली पदार्थ तस्करीत सामील असलेल्या आणि पोलिसांना चकवा देणाऱ्या 'मोस्ट वॉन्टेड' नायजेरियन तस्करांना अटक करण्यात पोलिसांना मोठे यश आले आहे. अत्यंत गोपनीय पद्धतीनं आणि नियोजनबद्ध रीतीनं केलेल्या या कारवाईमुळे ड्रग्ज तस्करांना पळून जाण्याची कोणतीही संधी मिळाली नाही. अटक करण्यात आलेल्या या नायजेरियन नागरिकांवर कोट्यवधी रुपयांच्या अमली पदार्थांची तस्करी केल्याचे गंभीर आरोप आहेत. अनेक गुन्ह्यांमध्ये पोलिस गेल्या अनेक दिवसांपासून त्यांच्या शोधात होते.

<><><><><>

मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर महसूल गुप्तचर संचालनालयानं केलेल्या कारवाईत सुमारे सव्वादोन किलो कोकेनचा साठा जप्त केला आहे. त्याची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतली किंमत अंदाजे सव्वाअकरा कोटी रुपये आहे. आदिस अबाबाहून आलेल्या २ प्रवाशांवर गेल्या मंगळवारी तर २ प्रवाशांवर काल केलेल्या कारवाईत हा साठा मिळाला. यापैकी दोघांनी कोकेनच्या कॅप्सूल गिळून पोटात लपवल्या होत्या. त्यांना रुग्णालयात भरती करण्यात आलं, तसंच चारही प्रवाशांना अटक केली असल्याचं संचालनालय सूत्रांनी सांगितलं.

<><><><><>

मुंबई ते मांडवा या जलमार्गावर सुरू असलेली जलवाहतूक येत्या २६ तारखेपासून बंद होणार असल्याची माहिती मेरिटाइम बोर्डाने दिली आहे. गेटवे ऑफ इंडिया इथून बोटी सुटतात आणि अलिबाग तसंच परिसरातील जनतेसाठी ही वाहतूक व्यवस्था सोयीची समजली जाते. नारळी पोर्णिमेनंतर ही सेवा पूर्ववत सुरू होईल.

<><><><><>

प्रस्तावित 'राज्य देवस्थान इनाम निर्मूलन मसुदा कायदा, २०२६' मागे घेण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र मंदिर महासंघाने उद्यापासून राज्यव्यापी आंदोलन सुरू करण्याचा इशारा दिला आहे. या कायद्यात वक्फ जमिनींना वगळून हिंदू मंदिरांच्या मालमत्तांना लक्ष्य केलं जात असल्याचा दावा महासंघाने केला आहे. महासंघानं जारी केलेल्या प्रसिद्धिपत्रकात

या बाबत माहिती देण्यात आली आहे. राज्य सरकारनं या बाबत चर्चा करायला बोलावल्याचंही पत्रकात नमूद करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

‘नीट २०२६’ पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने पुण्यातून आणखी एका शिक्षिकेला अटक केली आहे. मनीषा संजय हवालदार असे अटक करण्यात आलेल्या शिक्षिकेचे नाव असून त्या भौतिकशास्त्र विषयाच्या प्रश्नपत्रिकेशी संबंधित असल्याचे तपासात समोर आले आहे.

**<><><><><>**

जिनेव्हा खुल्या टेनिस स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत भारताचा युकी भांबरी अंतिम फेरीत दाखल झाला आहे. न्यूझीलंडचा मायकेल व्हीनस आणि युकी भांबरी यांच्या जोडीने काल उपांत्य फेरीत झेक रिपब्लिकच्या जोडीचा ७-५, ६-३ असा पराभव केला. अंतिम सामना आज दुपारनंतर होणार आहे.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यात माजलगाव तालुक्यातल्या खरात आडगाव इथं एका बोरवेलच्या खोदकामाच्या ठिकाणी दोन मजुरांचा मृत्यू झाला. त्यापैकी एकाचा मृतदेह मिळाला असून दुसरा मृतदेह बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरु आहेत. या अपघातात १६ वर्षांचा एक मुलगाही जखमी झाला. त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केलं आहे.

**<><><><><>**

सोलापूरमधील काँग्रेसचे माजी नगरसेवक आणि आंबेडकरी नेते प्रवीण निकाळजे यांचे हृदयविकाराच्या तीव्र धक्क्यानं आज सकाळी निधन झालं. ते ५८ वर्षांचे होते. प्रवीण निकाळजे हे २०१७ मध्ये प्रभाग क्रमांक २० मधून निवडून आले होते.

**//<><><><><>//**